॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव्य शास्त्र प्रशाळे अंतर्गत असलेल्या मानसशास्त्र विभागाच्या वतीने दि. १४ फेब्रुवारी पासून 'विवेकी उपचार पध्दती तंत्रे' या विषयावरील तीन दिवसीय कार्यशाळेला प्रारंभ झाला.

आंतरराष्ट्रीय विवेकी उपचार पध्दती तज्ज्ञ योगिता पांडे यांनी कार्यशाळेत सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्रात प्रथमच विद्यापीठात ही कार्यशाळा होत आहे. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रभारी संचालक प्रा. राम भावसार, डॉ. विना महाजन, डॉ. तुषार रायसिंग, डॉ. सुचित्रा लोंढे, तेजस मराठी व डॉ. मनोज गुरव प्रयत्नशील आहेत. दि. २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत याच विषयावर दुसऱ्या तुकडीची कार्यशाळा होणार आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१४ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दुचाकी वाहनांसाठी हेल्मेट सक्ती करण्यात आली असून दि. १४ फेब्रुवारी पासून याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. हेल्मेट परीधान न करणाऱ्यांना विद्यापीठ प्रवेशद्वारापासून आत प्रवेश देण्यात आला नाही.

रस्ता व सुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी व्हावी या अनुषंगाने जिल्हा पोलिस प्रशासनाने राष्ट्रीय महामार्गावर हेल्मेट सक्ती केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि. १३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाने कार्यालयीन सूचना काढून दुचाकी वाहनांसाठी हेल्मेट सक्ती व चार चाकी वाहनांसाठी सिट बेल्टचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. दि. १४ फेब्रुवारी पासून विद्यापीठाच्या राष्ट्रीय महामार्गाजवळील मुख्य प्रवेशद्वार तसेच मुलांचे वसतीगृहाजवळील प्रवेशद्वाराजवळ हेल्मेट न घालणाऱ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. प्रवेशद्वाराजवळ दुचाकी वाहन लावून अनेक जण पायी विद्यापीठात आले. जवळपास ६० पेक्षा अधिक वाहनांना रोखण्यात आले.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ | दि. १४ फेब्रूवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी